# विनोबा-वार्ता

दैनिक साम्ययोग

मासिक वर्गणी १.५० पैसे | किरकोळ अंक १० पैसे

अंकः २०२ ) शनिवार ता. २८-११-६४ नोव्हेंबर

## शहरात सर्वोदय कार्य —

# बडोद्यात झालेल्या परिसंवादाचे निष्कर्ष

— सिद्धराज ढढ्ढा

भूदान, ग्रामदान आंदोलनाच्या रूपाने सर्वोदय आंदोलनाचे कार्यक्षेत्र मुख्यत: खेडे विभागातच राहिलेले आहे. सर्वोदयाचे कार्य बाह्य शक्तीच्या सहाय्याने फलद्रूप व्हावयाचे नसून लोकांची अभिक्रमशीलता जागवून आणि त्यांच्याच कर्तृत्वाने ते सिद्ध होणार असल्यामुळे ते आंदोलन प्रारंभी ग्रामीण विभागात फोफावले ही अेक साहजिकच घटना म्हणता येईल. खालचा पाया मजबूत झाल्यामुळेच आंदोलनांत चैतन्याचा संचार होऊ शकतो.

परंतु शहरवासीयांच्या जीवनातसुद्धा सर्वोदयाची दृष्टि ठेवून काम करण्याची नितांत गरज आहे. शहरवासी संख्येने कमी दिसत असले तरीहि आज समाजावर त्यांचाच प्रभाव आहे आणि शहरवासीच समाजाचे नेतृत्व करीत आहेत. चिन्तन व विचार विमर्श प्रामुख्याने शहरातूनच चाललेले असतात. ह्या शहर विभागातहि सर्वोदयाचे कार्य संघटितपणे उभारण्याचे आवाहन विनोबांनी १९६० सालीच इंदूर शहरातील आपल्या यात्राकालात आम्हाला केले होते. त्यांनी अेक प्रकारे आपली अग्रगामी योजना (पायलट-प्रोजेक्ट) तेथे सुरूच करून दिलेली आहे. मुंबई, बंगलोर, तेनाली, बडोदा, कानपुर, आग्रा इत्यादि शहरातहि मागील काही वर्षांपासून काम चाललेले आहे.

सर्व सेवा संघाच्या प्रबंध समितीने शहरात आतापर्यंत झालेल्या कामांच्या अनुभवाच्या आदानप्रदानासाठी व त्या आधारावर पुढील कार्यक्रम बनविण्यासाठी अेक परिसंवाद घ्यावा असे १९६४ सालच्या जुलै महिन्यात ठरविले होते. ह्या निर्णयानुसार ता.२०,२१ ऑक्टोबर रोजी बडोदा शहरात अेक परिसंवाद झाला. परिसंवादासाठी निरनिराळ्या प्रांतातून मोठ्या संख्येने कार्यकर्ते गोळा झाले होते. सामाजिक, शैक्षणिक व अन्य क्षेत्रात काम करणाऱ्या निरनिराळ्या क्षेत्रातील भिन्न मतप्रणालीच्या कार्यकर्त्यांनाहि, त्यांच्या अनुभवांचा लाभ मिळावा म्हणून, परिसंवादासाठी निमंत्रणे गेली होती. गुजरात सर्वोदय मंडळाने स्थानिक लोकांच्या सहकार्याने ह्या शिबिराची व्यवस्था केली.

१३ वर्षे भूदान आंदोलनाची उलटून गेल्यावरहि प्रथमतः च शहराबाबत गंभीरपणे विचार करण्यास कार्यकर्ते अेकत्र आलेले होते. सर्व सेवा संघाचे अध्यक्ष श्री. मनमोहन चौधरी हे परिसंवादाचे अध्यक्षस्थानी होते. खालील मुद्दे चर्चेसाठी ठेवले होते.

(१) शहरातील सर्वोदय कार्याचा हेतु कोणता असावा ? शहरातील कामापासून आमच्या कोणत्या अपेक्षा आहेत ?

(२) आजपर्यंतच्या कामात आलेल्या अनुभवाबाबत चर्चा आणि इष्ट हेतु साध्य होण्याच्या दिशेने त्या कार्याद्वारा गाठलेल्या मजलीचे मूल्यांकन.

(३) सर्वोदयाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी शहरात कसल्या प्रकारचे कार्यक्रम चालवावे, ह्या संबंधी दिशासूचन.

(४) शहरातील कार्याचे संघटन व संबंधित कार्यपद्धतिबाबतचे प्रश्न.

परिसंवादात झालेल्या चर्चेचे सार खालील प्रमाणे.

### कार्याचा उद्देश्य

(१) आमच्या कार्याचा अेकमेव उद्देश्य म्हणजे सर्वोदय समाजाची स्थापना करणे. म्हणजेच जेथे शोषण व संघर्ष नसेल असा समाज बनविणें.

(२) हे परिवर्तन लोकांच्या स्वेच्छेने व लोक अभिक्रमाने व्हावे. शहरातील लोकात आज जो विस्कळितपणा, परस्पराबद्दल उपेक्षावृत्ति आलेली आहे, ती घालवून त्या जागी परस्पर संवेदना, करुणा व मैत्रीची भावना जागविणे. अेकमेकांच्या सुखदु:खात व दैनंदिन जीवनात परस्पराशी सहभागी झाल्याने हे शक्य होऊ शकेल.

(३) अंततोगत्वा शहरें आपल्या जीवन गरजांच्या पूर्तीसाठी मुख्यतः खेड्यांवरच अवलंबित आहेत. परंतु आजच्या पक्षपाती समाजव्यवस्थेमुळें त्यांना ह्या गोष्टीचे भान राहिलेले नाही. येवढेच नव्हे तर शहरवासीयात अेकप्रकारे अहंकार-उच्चतेची भावना निर्माण झालेली आहे. शहर व खेडी ह्यांच्यातील परस्परावलंबन व परस्पराबद्दल जबाबदारीची भावना ह्याचे भान शहरवासीयांना करविणे व त्यांना ग्रामाभिमुख बनविणे हाहि आमच्या कार्याचा अेक उद्देश्य आहे. आज सामान्यपणे साझेदारी व जबाबदारीची भावना शहरातील मालक मजुरात निर्माण व्हावी असा प्रयत्न चालतो परंतु हा अर्धवट विचार आहे. ह्या हिस्सेदारीत गावें व अन्य समाजालाहि स्थान असले पाहिजे.

(४) ग्रामस्वराज्याचा विचार शहरातील बुद्धिजीवी लोकांनी स्वीकारावा. सर्वोदयाचा व ग्रामस्वराज्याचा विचार ते समजून घेतील आणि ग्रहण करतील असा प्रयत्न कार्यकर्त्यांकडून व्हावा.

(५) भूदान, ग्रामदान आणि ग्रामस्वराज्य प्रस्थापनेचे जें कार्य आज खेड्यातून चालले आहे, त्या कामाबाबत शहरवासीयांच्या मनात सहानुभूति निर्माण करावी, आणि त्यांच्याकडून ह्या कामासाठी साधनदान व संपत्तिदान मिळवावे.

(६) सामाजिक जीवनात आज जी फुटीर वृत्ति बळावत आहे ती घालवून त्या जागी अेकीकरणाची-'इंटीग्रेशन'-ची भावना निर्माण करणे.

### प्रश्नाचे स्वरूप व कार्याची दिशा

शहरांची एक विशेष परिस्थिति आहे. उदाहरणार्थ मोठ्या संख्येत लोकांची अेकत्र वास्तव्य करणे, बुद्धिजीवी लोकांची फुगलेली संख्या, परस्पर संपर्क व अवलंबनाचा अभाव. स्वराज्यानंतर आमच्या देशात शहरांची वाढ झाली व काही नवीन मोठी शहरे वसली, पण त्यापाठीमागे प्रमाणबद्धता किंवा योजक बुद्धीचा अभाव दिसतो. त्यामुळे आज शहरी जीवनात अनेक प्रश्न उपस्थित झालेले आहेत. मोठमोठ्या उद्योगांसोबतच, समाजसेवा करणाऱ्या संस्था व शिक्षण संस्थांची केंद्रें पण मोठ्या शहरातच केंद्रित झालेली आहेत. त्यामुळे मूळच्या प्रश्नांत आणखी नवो भरच पडली आहे. त्यामुळे निर्माण झालेल्या प्रश्नांवर आपण विचार करावा. त्यासाठी विज्ञान, तंत्रज्ञान ह्यांची मदत घ्यावी, आणि क्षमतावान लोकांसोबत विचार विमर्श करावा व लोकात ह्या प्रश्नाबाबत चर्चेद्वारा हालचाल निर्माण करावी. आज शहरी जीवन हे विषमता व संघर्ष ह्यांचे प्रतीकच बनलेले आहे, तरीहि आज शहरांची आम्हाला उपेक्षा करून चालणार नाही. कारण आज शहरे आमची ब्रेन-ट्रस्ट-बुद्धिभांडारे-बनलेली आहेत. शहरातील लोकांच्या दु:खांबाबत आम्हाला सहवेदना असावी व त्यांचे प्रश्न सोडविण्याच्या कामातहि आम्ही सहयोग द्यावा, त्यांच्यात अभिक्रम जागृत करावा. शहरात वसणाऱ्या सज्जन लोकांची व सेवाभावी संस्थांची आम्ही ह्या कामी मदत घ्यावी. शहरे आणि खेडी ह्यांच्यात आम्हाला सामंजस्य निर्माण करावयाचे आहे. गावांना काहीसे शहराचे रूप व शहरांना ग्रामीणस्वरूप आम्हाला द्यावयाचे आहे. आमची अल्पशक्ति लक्षात घेता संपूर्ण शहराला आम्ही हात न घालता मोहल्ल्यापासून कामाला प्रारंभ करावा. शहरात प्रभावशाली काम करण्यासाठी सातत्य व स्थैर्याची गरज असते. आठदहा वर्षेतरी हेच काम करीत रहायचे आहे असे समजूनच कार्यकर्त्यांने शहरातील कामाला हात घालावा.

शहरातील बहुतांश प्रश्न उद्योग-व्यापाराशी संबंधित असतात. खेड्यातील उत्पादनाचे मुख्य साधन जी जमीन तिच्या मालकी संबंधी व व्यवस्थेसंबंधी आम्ही समाजासमोर अेक नवीं दृष्टि ठेवली आहे. शहरातील आजीविकेचे मुख्य साधन उद्योग धंद्यांचे असते. तेव्हा त्या धंद्यांची मालकी, त्या धंद्यात काम करणारांचे परस्पराशी नाते, धंद्यांची रचना ह्याबाबत आमचे विचार स्पष्ट तऱ्हेने लोकांसमोर आम्हाला मांडता आले तरच आम्हाला शहरात यशस्वीपणे काम करता येईल. हे अत्यंत महत्वाचे प्रश्न असून त्याबाबत सखोल अध्ययन आम्हाला करावयास पाहिजे.

आज अेका बाजूला उद्योगधंद्यात व्यक्तिगत मालकी तर दुसऱ्या बाजूला सरकारी मालकी ह्या दोनच पर्यायावर चर्चा होत असते. प्रायवेट सेक्टर व पब्लिक सेक्टर-म्हणजे खाजगी क्षेत्र किंवा सरकारी मालकी ऐवजी, सरकारी पद्धति

www.vinoba.in

# हेमडी ग्रामदानी गांवच्या सामूहिक जीवनाचे दर्शन

**शंकरराव वेले, वर्धा.**

कुलाबा जिल्ह्यातील हेमडी या ग्रामदानी गांवाला महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध विधायक कार्यकर्ते, नाग विदर्भ चरखा संघाचे अध्यक्ष, श्री. शंकरराव वेले यांनी गेल्या महिन्यात आपल्या सहकाऱ्यांसह भेट दिली. त्या गांवात त्यांना जे दर्शन झाले ते त्यांनी या लेखांत दिले आहे.

हेमडी हे गांव गेल्या दोन तीन वर्षांत नवीन वसाहतीच्या रूपांत वसविलेलें छोटेसे गांव. १४ कुटुंबांचे व १०४ जनसंख्या असलेले कुलाबा जिल्ह्यात, पेण तालुक्यात, पू. विनोबाजींच्या जन्मस्थानापासून, म्हणजेच गागोदे गांवापासून, फक्त दोन मैलावर हे गांव आहे. पूणें अलिबाग एस्. टी. च्या बस मार्गावर, पेणच्या अलिकडे, पूर्वेस ९ मैल, सडकेच्या कांठीच असलेली ही छोटीशी वसाहत आहे.

गागोदे परिसरातीलच हे गाव असल्याने, तेथील शुद्ध विचारांच्या प्रवाहाचा परिणाम हेमडीच्या आदिवासीयांना मानवला. चांगल्या गोष्टींचा प्रसार सर्वत्र एकसारखा होताना आजच्या कलियुगांत अनेक अडचणी असूं शकतात. त्याला अनुसरूनच म्हणा अगर कांही म्हणा, हेमडीने त्या सर्व अडचणींना तोंड देऊन त्या परिसरातील इतर गांवापेक्षां आघाडी मारली आहे हे प्रत्यक्ष दर्शनानंतर कळून येतेच.

महाराष्ट्र प्रदेश नवनिर्माण समितीचे मुख्य संयोजक श्री. गोविंदराव शिंदे, महाराष्ट्र सेवा संघाचे मंत्री श्री. ना. रा. सोवनी, यांच्या सोबत दिनांक २४-१०-६४ ला हेमडी गांवाला जाण्याचा सुयोग जुळून आला. आम्ही तेथे गेलो. त्या गांवाचे दर्शन घेतले, आणि त्या दर्शनातून जे प्रत्यक्षांत कळले ते आज माहिती रूपात प्रसिद्ध करीत आहे.

फार प्रसिद्धि झाली कीं, दृष्ट लागते म्हणतात. देवादिकानाही पृथ्वीवर फार चांगले होत असलेले पाहवत नाही. मग आम्ही तर मानवच आहोत. म्हणून ह्या गांवाला दृष्ट लागूं नये, कोणतीहि क्लृप्ति योजण्यास कोणालाच गुंजाइश मिळूं नये ह्याची काळजी आम्ही स्तुति पाठकांनी घ्यावयास हवी. तशी तर त्या गांवाचे पालन पोषण करून विकासाच्या मार्गावर नेणारे तेथील प्रमुख कार्यकर्ते श्री. निरंजन मेणसेजी काळजी वाहतच आहेत. आई आपल्या मुलाला दृष्ट होऊ नये म्हणून बाळाच्या सुंदरतेत थोडेसे गालबोट लावून ठेवते. तितकी काळजी घेण्याची जबाबदारी सर्वांचीच आहे, हे अनुभवाने मी येथे नमूद करीत आहे.

## प्रगति पथावर

हेमडी हें गांव मूळचे एकत्र वसलेलें नव्हते. आदिवासीयांच्या रीतिरिवाजाप्रमाणे एक एक, दोन दोन कुटुंबे, कोठे तरी उंचावर, आपल्या झोपड्या बांधून १-१॥ मैलाच्या क्षेत्रफळाच्या जागेत मुष्किलीने १०-२० कुटुंबे राहून, आपले गांव समजत असत. १९६१ साली महाराष्ट्र गांधी स्मारक निधिच्या गागोदे केंद्रातील कार्यकर्त्यांनी व सर्वोदय मंडळाच्या कार्यकर्त्यांनी भूदान-ग्रामदानाचा प्रचार करून आठ गांवे गागोदे परिसरातील ग्रामदानात मिळवली. त्यातूनच पुढे आलेले हेमडी हे गांव होय.

आदिवासीयांना भूदानांत जमीन वाटली गेली होती, त्याचेच रूपांतर हेमडीच्या लोकांनी ग्रामदानात लवकरच करून आपल्या गांवाच्या विकासाला सुरवात केली. आपल्या गांवाला "ग्रामदानी" हा शब्द जोडला गेला तेव्हां आपला विकास करण्याची जबाबदारी आपलीच आहे असे जाहीर करून ते कामाला लागले.

त्यांची प्रयत्नशीलता पाहुन अन्य जनहि त्यांना मदत करूं लागले. त्याचा परिणाम हळूहळूं चांगला होत गेला. कधी कधीं बाहेरची मदत चांगले काम बिघडविण्यासहि कारणीभूत होत असते. तेवढे मदत घेणाऱ्यांनी जपावयास मात्र हवे.

कांही गांवे विकासाच्या मार्गावर असतात, पण 'ग्रामदानी' हा शब्द आपल्या गांवाला इतक्यांत लागूं नये म्हणून फार काळजी घेतात. एकदा कोणी संन्यास घेऊन आपली जनांत प्रसिध्दि केली तर मग त्याच्यावर नियम पाळण्याची जबाबदारी पडतेच. त्या नियमानी आत्मबल वाढवून विकासाच्या मार्गावर चालावे लागते. पण जर कां चुकले तर खाली पडण्याची भीति त्याच्यापेक्षा प्रेक्षकांनाच जास्त वाटते. त्याप्रमाणें आज बरीचशी गांवे विकासाच्या मार्गावर असून देखील, व ग्रामदानी गांवाच्या तोडीची कामें करीत असतांना सुद्धां, 'ग्रामदानी' ह्या शब्दाचा स्पर्श न व्हावयाची दक्षता कांही प्रमुख गांवकरी बाळगतात. कारण स्पष्ट कल्पना त्यांना असते कीं, गांवाचे भले करतांना आपलेही कांही प्रथम गमवावे लागते. एवढी तयारी झाली तर मग कोठेच कमतरता भासणार नाही. पण आज तीच कमी आहे, हे कांही लपलेले नाही. त्यासाठीं धीरानेच काम घेऊन आपले समजविण्याचें कार्य, पू० विनोबाजींचा आशीर्वाद घेऊन, त्यांच्या मार्गदर्शनाखाली चालूं ठेवावयास हवे.

प्रथम हेमडीच्या गांवकऱ्यांनी आपल्या विखुरलेल्या झोपड्या मोडून, एकत्र येऊन, वसाहत करण्याचा निर्धार केला. आदिवासी कल्याण विभागाकडून प्रत्येक कुटुंबामागे मिळणारी आर्थिक मदत रु० ७५० व स्वतःचे श्रम भरीला घालून भरपूर हवा, उजेड व जमीनीला ओल न यावी म्हणून थोडे उंच असें ओटे बांधून घेऊन, त्यावर खांब उभारून, बंगलोरी कवेलूचे छप्पर उभारले व नंतर आवश्यकतेप्रमाणे आडोश्याच्या जागा, सामान सुमानाची सुरक्षितता म्हणून कांही कुडाच्या भिंती घालून आपली सोय करून घेतली.

गांवकरी एकत्र येऊन वसाहत करून राहूं लागल्यानंतर गांवकऱ्यांना पूर्वीच्या पद्धतीत व आजच्या पद्धतीत काय फरक, लाभ दिसून आला असा एक प्रश्न श्री० सोवनी यांनी एका गांवकरी प्रमुखाला विचारला असतां, त्याचेकडून उत्तर मिळाले कीं, आम्हाला आमच्या कुटुंबाच्या जीवाचे, मालमत्तेचे, पिकांचें, हिंस्त्रपशु, जंगली जनावरें, व अन्य लुटारू यांपासून सामुहिक पद्धतीने संरक्षण करणे फार सोपे झालेले आहे.

हेमडी गांव ग्रामदानी झाले. वसाहत झाली. सामूहिक भावना वाढीला लागली. अस्ताव्यस्त असलेली शेती वसाहतीच्या शेजारच्या जागेसह उठित करून पिकाखाली घेण्यांत आली. आज त्यांच्या गांव मालकीची जागा २५ एकरांवर भातशेती खाली आलेली दिसत आहे. भातशेतीला हुकमी पाण्याची आवश्यकता असते. नुसते पावसाच्या भरंवशावर राहून चालणार नाही ही त्यांना जाणीव झाली. जवळच एक ओढा पावसाचे पाणी पहाडावरून खळखळ वाहवत नेऊन नदीला मिळवणारा होता. नदीचे पाणी समुद्राला जाऊन मिळते मग ह्या नैसर्गिक सोयीचा फायदा आपणच कां घेऊं नयें ? हा विचार गांवकऱ्यांच्या मनांत शिरला म्हणा कीं शिरविला गेला. सुपरिणाम झाला. पहाडाच्या पायथ्यापासून वाहत आलेला ओढा जरा उंच अशा जागी, जेथून भातशेतीला पाणी जरूरीप्रमाणें घेतां येईल अशा सुयोग्य ठिकाणीं, पाट बांधून उपयोगांत घेतला. पहाडाच्या पायथ्या पायथ्याने पाण्याचा प्रवाह भातशेतींत घेण्यासाठीं गावकऱ्यांनी -स्त्री, पुरुषांनी-आपल्या परिश्रमानें पाट खोदून काढला व हुकमी पाण्याची सोय करून घेतली. जादा पाणी समुद्राला जाईल अशीही त्यांनी सोय आधींच सुरक्षिततेच्या दृष्टीने करून ठेवली.

भातशेतीला तसेच नाचणी, रताळी आदि पिकांना हुकमी पाणी मिळाल्याने सामूहिक पद्धतीचा स्वीकार केल्याने, श्रमाची वानवा नसल्याने व गांवची गुरे एकत्र झाल्याने कंपोस्ट खताची भर पडली. मग उत्पन्न कां वाढणार नाही ? सहजच दरवर्षी त्यांचे उत्पन्न वाढूं लागले. पोटाला पुरेसे खावयास मिळूं लागेल अशी योजना बनवली गेली. पूर्वीच्या पद्धतिप्रमाणे सावकाराकडील कर्ज पावसाळ्याच्या प्रारंभी आणावे. पीक येतांच त्याची फेड करावी. परत मोल मजूरीला लागावे. हा त्यांचा क्रम होता. ह्या क्रमांत श्री. निरंजनभाई यांनी गांवकऱ्यांना समजाऊन देऊन बदल घडवून आणला. गांवकऱ्यांची पुरेशी तयारी झालेली पाहून गांवाची सहकारी संस्था रीतसर रजिस्टर करून घेतली. सरकारी सहायता कर्जरूपाने मिळवली. कर्ज बिन व्याजी व हप्ते वारीने फेडण्याचा करार असल्याने बरीच अनुकूलता निर्माण झाली. १५००० रुपयांच्या आसपास कर्ज मिळविले. त्यांतच रबी पिकाच्या पाणी पुरवठ्यासाठी एक ५ हॉर्सपॉवरचे ऑईल इंजिन मिळविले. इतकी सवलत मिळताच गांवकऱ्यानी सावकारी पाशातून सुटका करवून घेण्याचा निर्धार केला. सावकारांशी बोलून जुन्या कर्जांची फेड हप्तेवारीने करूं असे आश्वासन दिले. नवीन कर्ज सावकारांकडून घ्यायचे नाही हा निश्चय केला. आज त्यांच्या श्रमाने निर्माण झालेले धान्य त्यांच्या १०४ जीवांना ९ महिने पुरेल इतपत व्यवस्था झालेली आहे. अजून तीन महिने पुरेल एवढे धान्य, जी थोडीशी खाणारी तोंडे पुढे वाढतील त्यांचाही विचार करून, वाढविण्याची त्यांची सर्वतोपरी तयारी चाललेली आहेच. नवीन भातशेती खाली जमीन आणली जात आहे. उत्पन्नहि भरपूर प्रमाणांत घेण्यासाठी प्रयत्न होतीलच.

रबीचे पीक घेण्यास आज हेमडी गांवकऱ्यांजवळ जमीन व पाण्याची नीट व्यवस्था नाही. म्हणून गांवा शेंजारच्या सडकेच्या पलीकडे जवळच वाहात असलेल्या नदीच्या कांठची जमीन, तात्पुरती कां होईना, आपल्या शेंजारच्या गांवच्या आप्तेष्टांकडून मिळवून, नदीच्या डोहातील भरपूर पाणी ऑईल इंजीनच्या साह्याने घेऊन, कांही बागायती शेती करण्यास यंदाच नव्याने प्रयत्न सुरू झालेला आहे. अशा प्रकारे शेतीचे काम संपत्तिदानातून अधिक एक बैलजोडी व जिल्हा परिषदेकडून टोणग्यांची एक जोडी मिळवून व आधीच्या बैलजोड्या अशा एकूण १२ जनावरांची मदत घेऊन स्वतःचे पराक्रम खर्ची घालून, उन्नतीला पोचवण्याची सतत धडपड सुरू असलेली दिसून येत आहे.

www.vinoba.in

